## कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक विभाग)

क्र. शि.वि./क्री. सां.वि./३०१० / शि/वि                                                        दि. २२/७/२०१४

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका

-------------------- प्राथमिक/उच्च प्राथमिक/माध्यमिक विद्यालय.

**विषय :-** **"महापौर चषक" वंदेमातरम् समुहगान स्पर्धा - २०१४-२०१५.**

नागपूर महानगरपालिका **"शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्य"** दि. ०९ ऑगष्ट ते १४ ऑगष्ट २०१४ पर्यंत म.न.पा. प्राथमिक / उच्च प्राथमिक / माध्यमिक शाळा तसेच सर्व प्राथमिक / उच्च प्राथमिक / माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांकरिता **"महापौर चषक"** वंदेमातरम् समुहगान स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

**स्पर्धा या गटानुसार राहतील** - १) गट क्रमांक - १ - वर्ग ९ ते १०
- २) गट क्रमांक - २ - वर्ग ६ ते ८
- ३) गट क्रमांक - ३ - वर्ग १ ते ५

**<u>स्पर्धेचे नियम</u> :-**

१) प्रवेश नि:शुल्क राहिल.

२) सर्व गटातील स्पर्धकांना वंदेमातरम् पूर्ण गीत सादर करणे अनिवार्य राहिल. त्यासोबत कोणतेही देश भक्तिपर गीत असे दोन गीते सादर करावे लागेल.

३) प्राथमिक फेरीद्वारा उत्कृष्ट पाच शाळांची निवड अंतिम फेरीसाठी करण्यात येईल. त्यामध्ये म.न.पा.ची एक शाळा अंतिम फेरीकरिता पात्र राहिल.

४) गीत सादर करणारे विद्यार्थी परिपत्रकातील गटानुसार वर्गातील असावे. यानुसार न आढळल्यास किंवा इतर सहभागी शाळांनी आक्षेप घेतल्यास त्वरीत त्याबाबत पुरावा सादर करावा लागेल. अन्यथा त्या शाळेला स्पर्धेतून बाद करण्यात येईल, व संबंधित मुख्याध्यापकास जबाबदार धरण्यात येईल.

५) स्पर्धेत एकूण १० ते १५ विद्यार्थीसह वाद्यवृंदाचा समावेश राहिल. वाद्यवृंद संघात हार्मोनियम व तबला त्यासोबत ढोलकी, ढोलक, बॅन्ड, साईड ड्रम, झांज, घुंगरु, मिराकस, डफ ही वाद्ये वापरता येतील.

६) प्रत्येक गटाकरिता वेगळया विद्यार्थीची निवड करावी. तसेच वाद्यवृंद संघात विद्यार्थ्यांचा समावेश असल्यास प्राधान्य देण्यात येईल. शालेय गणेवशातच गीत सादर करणे अनिवार्य राहिल.

७) स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या शाळांनी आपले प्रवेशपत्र दि. ६ ऑगष्ट २०१४ पर्यंत क्रीडा व सांस्कृतिक विभाग म.न.पा. केंद्रीय कार्यालय, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे कार्यालयीन वेळेत सादर करावे. प्रत्येक गटाकरिता वेगळे प्रवेशपत्र सादर करावे.

८) अंतिम स्पर्धा १४ ऑगष्ट २०१४ ला होईल. स्पर्धेचे स्थळ प्राथमिक फेरीच्या दिवशी जाहीर करण्यात येईल.

९) सहभागी सर्व शाळांनी स्पर्धास्थळी अर्धा तास अगोदर उपस्थित असल्याची नोंद करावी लागेल.

१०) यानंतर येणाऱ्या शाळांची नोंद घेण्यात येणार नाही. याबाबतची खबरदारी संबंधित शिक्षकांनी घ्यावी.

११) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहिल.

<u>**पुरस्कार**</u> **:-** (सर्व गटातील विजेत्याकरिता)

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक :- | रु. १०,०००/- | रोख महापौर चषक व विद्यार्थ्यांना वैयक्तिक बक्षिसे |
| द्वितीय क्रमांक :- | रु. ७,०००/- | रोख --------------------//-------------------- |
| तृतीय क्रमांक:- | रु. ५,०००/- | रोख --------------------//-------------------- |
| चतुर्थ क्रमांक :- | रु. ३,०००/- | रोख --------------------//-------------------- |
| पाचवा क्रमांक :- | रु. २,५००/- | रोख --------------------//-------------------- |

म.न.पा. शाळा उत्तेजनार्थ :- रु. २,५००/- रोख --------------------//--------------

विशेष पुरस्कार :- रु. ३,०००/- रोख --------------------//--------------------

(अंध/विकलांग/मतिमंद शाळांकरिता) रोख पुरस्कार धनादेश द्वारे देण्यात येईल.

## <u>प्राथमिक फेरी वेळापत्रक</u>

| | | |
|---|---|---|
| गट क्रमांक - १ - वर्ग ९ ते १० | दि. ९ ऑगष्ट २०१४ | सकाळी ९.३० वा. |
| गट क्रमांक - २ - वर्ग ६ ते ८ | दि. ११ ऑगष्ट २०१४ | -------//------- |
| गट क्रमांक - ३ - वर्ग १ ते ५ | दि. १२ ऑगष्ट २०१४ | ------//-------- |

<u>**स्थळ**</u> **:-** अध्यापक भवन, एस.टी. स्टॅन्ड समोर, गणेशपेठ, नागपूर.

प्राथमिक स्पर्धेतून निवड झालेल्या शाळांची अंतिम स्पर्धा दि. १४ ऑगष्ट २०१४ रोज गुरुवारला सकाळी १०.०० वा. सुरु होईल. बक्षिस समारंभ दुपारी १ वाजता होईल.

<u>**अंतिम स्पर्धा स्थळ**</u> **:-** शिक्षक सहाकारी सभागृह, गांधीसागर तलाव, नागपूर.

**टिप :-** संघ प्रवेशबाबत त्वरीत कळवावे. अधिक माहितीकरिता श्री. विजय इमाने/श्री. संजय भुरे, क्रीडा व सांस्कृतिक विभाग केंद्रीय कार्यालय, म.न.पा. सिव्हिल लाईन्स, नागपूर यांचेशी संपर्क साधावा. मो.नं. ९८२२५०१०१९/९१५८९११९८४/९७६५५६९१२७

| | | |
|---|---|---|
| **शिक्षणाधिकारी** | **शिक्षणाधिकारी** | **क्रीडा निरिक्षक** |
| **माध्यमिक जिल्हापरिषद** | **महानगरपालिका, नागपूर** | **महानगरपालिका, नागपूर** |
| **नागपूर** | | |